कार्यालय
**सहाय्यक निंबधक सहकारी संस्था नवापुर जि. नंदुरबार**
न्युप्लॉट, महाराणा प्रताप मार्ग, अमळनेर
E-Mail: ar_nvr@radiffmail.com Phone No. ०२५६९ -

183 जाक्र./सहयोगी नागरी पतसंस्था/थकीतकर्ज/कलम८८/चौअधि/प्राधि /सन१७ दिनांक १० /०७/२०१७

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

वाचले:- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८
२) संस्थेचा सन २०१२-१३ ते २०१५ - १६ याकालावधीचा लेखापरीक्षण अहवाल

ज्या अर्थी सहयोगी नागरी सहकारी पतसंस्था मर्या नवापुर जि. नंदुरबार ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तील तरतुदीनुसार नोंदणीकृत सहकारी पतसंस्था असुन , संस्थेचा नोंदणी क्रमांक एन.बी. आर./ (एन.पी.आर) आर.एस.आर. (सी.आर) / १५१/२००२ -०३ दि. १९.०९.२००२ असा आहे. सदर संस्थेचे कार्यक्षेत्र नवापुर नगर परिषद वार्ड क्रमांक १४ पुरते मर्यादित असल्याने वैधानिकदृष्ट्या या कार्यालयाचे अधिकारकक्षेत येत आहे.

ज्या अर्थी संस्थेचे सन २०१२ -१३ ते २०१५ - १६ या कालावधीचे लेखापरीक्षण श्री आर. डी. राजपुत प्रमाणित लेखापीक्षक यांनी केले असुन लेखापरीक्षण अहवाल संस्थेचे व या कार्यालयास सादर केला आहे. संस्थेचा लेखापरीक्षण अहवाल दिनांक ०८/११/२०१६ रोजी प्राप्त झाला आहे. सदर लेखापरीक्षण अहवालाचे वाचन केले असता लेखापरीक्षण अहवालात संस्थेचे संचालक मंडळाने ठेवी स्विकारलेल्या आहे. कर्ज वाटप केले आहेत. परंतु वसुलीसाठी कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसुन आले नाही. सर्व कर्ज प्रकरणे १०० टक्के थकीत झाले आहे. संस्थेचे कर्ज वसुल होत नसल्याने संस्थेस आर्थिक नुकसान झाले आहे.

संस्थेने निधी अभारलेला आहे. परंतु स्वतंत्र खाती गुंतवणुक केली नाही. नियमबाह्य असुरक्षित गुंतवणुक केली आहे. सदर गुतवणुकीमुळे संस्थेस आर्थिक नुकसान झाले आहे असे गंभीर आक्षेप लेखापरीक्षण अहवालात नमुद केले आहे.

संस्थेचे एकुण येणे कर्ज रू ३,२४,५०६/- थकीत आहे. संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, मालमत्ता घसारा निधी व बुडीत कर्ज निधी रू २,६१,२१७/-फक्त कागदोपत्री उभारलेले आहे. मात्र त्याची स्वतंत्र खाती गुंतवणुक केली नाही.

संस्थेने रू १६,३९,६१७/- रू ठेवी स्विकारलेल्या आहेत. परंतु ठेवीचे योग्य नियोजन केले नाही. त्यामुळे संस्थेस आर्थिक नुकसान झालेले आहे व होत आहे.

संस्थेने रू २१,५२,३७७/- रू नियमबाह्या गुंतवणुक केली आहे. परंतु सदर गुंतवणुकीपासुन कोणताही आर्थिक फायदा नाही. गुंतवणुकीमुळे संस्थेस आर्थिक नुकसान झाले आहे व होत आहे.या सर्व बाबीस संस्थेचे व्यवस्थापन मंडळ जबाबदार आहे असे नमुद केले आहे.

ज्या अर्थी संस्थेस सन २०१२-१३ ते २०१५ - १६ या कालावधीचा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त होउनही विहीत मुदतीत दोष दुरूस्ती अहवाल सादर केला नाही व कर्ज वसुलीचा अहवाल ही सादर केला नाही. यावरुन संचालक मंडळ हेतुपुरस्कर कर्ज वसुली करणे टाळाटाळ करित आहे असे दिसून येत आहे. संचालक मंडळाने वाटप केलेले सर्व कर्ज प्रकरणे १०० टक्के थकीत झाले आहे व वसुलीसाठी कोणतेही प्रयत्न होत नाही असे स्पष्ट दिसुन येत आहे. यावरुन संचालक मंडळाने कर्ज वाटप करतांना अधिनियम, नियम व मंजुर उपविधीतील तरतुदीचे पालन केले नाही व असुरक्षित कर्ज वाटप केले आहे असे स्पष्ट झाले आहे. तसेच संचालक मंडळाने संस्थेचे ठेवीदारांचे ठेवीचे रक्कमचे योग्यरितीने विनियोग केला नाही असे दिसते. संस्थेचे संचालक मंडळाने वाटप केलेले सर्व कर्ज थकीत झाले असल्याने संस्था डबघाईस आली आहे. त्यामुळे ठेवीदारांना ठेवीची रक्कम परत करण्यास संस्थेस अडचणी निर्माण झाल्या आहेत. यामुळे ठेवीदाराची फसवणुक झाली आहे. संस्थेचे संचालक मंडळाने संस्थेचे हितासा बाधा आणणारे कृत्य केले आहे. या सर्व बाबीस संचालक मंडळ जबाबदार आहे.

ज्या अर्थी लेखापरीक्षण अहवालासोबत तारणी व वितारणी कर्ज प्रकरणाची स्वतंत्र यादी सादर केली नाही. त्यामुळे संस्थेचे कर्ज प्रकरणे किती कालावधीपासुन थकीत आहे याचा अर्थबोद होत नाही. संस्थेचे थकीत कर्जे वसुली होणेसाठी कर्जदार व जामिनदार यांची विहीत नमुन्यातील माहीती सादर करावी अशा लेखी कळविले होते. परंतु संस्थेने अद्यापही माहीती सादर केली नाही.तसेच थकीत कर्ज प्रकरणाचे लवाद प्रकरणे दाखल करावे असे सुचित केले आहे. परंतु संस्थेने थकीत कर्जदार व जामिनदार यांची लवाद प्रकरणे दखल केली नाही.यावरुन संचालक मंडळ कर्ज वसुल करण्यास हेतुपुरस्कर दिरंगाई करित असल्याचे दिसुन येते. संस्थेस ज्या कर्ज प्रकरणात कलम १०१ अन्वये वसुलीप्रमाणपत्र प्राप्त झाली आहे अशा कर्ज प्रकरणांची माहीती व वसुलीसाठी काय कार्यवाही केली याची माहीती सादर करावी असे कळविले होते. परंत सदरची माहीती

गामीनकी कर्ज ... ७१ येणे बाकी ... झाले आहे. कर्ज ... बाध केलेल्या ...

ब) ...

२. ... रामराव पाटील बँक रू ४,६२५/- विना परवानगी ... वसूल केले नाही. या संदर्भात चौकशी करून जबाबदारी ...

क) घसारा निधी रू ३३,३६३/-

ड) संशयित बुडीत कर्ज निधी रू १,३१,७९२/-

७,६९,०९०/-

६. संस्थेस झालेला तोटा रू १५,१९,५१८/-

७. संस्थेचे देणे असलेले इतर देणे रक्कम २,३२,१०८/-

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नवापुर, जि. नंदुरबार

सहाय्यक निबधक

सहकारी संस्था, ता. नवापुर